पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६४**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **०७/०४/२०१५** वेळ – सकाळी **११.००** वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **०७/०४/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
११) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१२) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१३) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१४) मा.काळे विमल रमेश
१५) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१६) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.कडूसकर, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.खाबडे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे, मा.औंबासे, मा.गट्टूवार - कार्यकारी अभियंता, मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.इंदलकर - कामगार कल्याण अधिकारी, मा.पाटील, मा.बोदडे, मा.बेंडे - प्र.अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

मा.सुनिता गवळी - मा.स्थायी समिती ठराव क्र.११८३ दि.३१/३/२०१५ मध्ये "व २०१६-१७" हा मजकूर वगळणेत यावा ही दुरुस्ती करुन दिनांक ३१/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६३) सभावृत्तांत कायम करणेत यावा.

मा.स्थायी समिती ठराव क्र.११८३ दि.३१/३/२०१५ मध्ये "व २०१६-१७" हा मजकूर वगळणेत यावा ही दुरुस्ती करुन दिनांक ३१/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक-३५) पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील वाढीव लोकसंख्येप्रमाणे जुन्या मलनिःसारण नलिकांचे सर्व्हेक्षण करणे व आवश्यक त्या ठिकाणी मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणेसाठी कन्सल्टंट नेमणेबाबत...

विषय क्रमांक-३६) निविदा नोटीस क्र.२/१/२०१४-१५ कामाचा विषय अवलोकनार्थ ठेवणेबाबत...

विषय क्रमांक-३७) अतिक्रमण विभागासाठी वाहन खरेदीकामी झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.शांताराम भालेकर, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३८) दिघी येथील गबाजी गवळी उद्यान सेवाशुल्क तत्वावर देखभाल संरक्षणाकामी देणेबाबत – मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३९) इ प्रभागातील सर्व स्टॉर्म वॉटर चेंबर्स साफ करणेबाबत - मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४०) सायन्स पार्क परिसरात तारांगण उभारणे कामाकरीता पी.के.दास अँड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नेमणुक करणेबाबत...

विषय क्रमांक-४१) निगडी,प्राधिकरण, सेक्टर क्र.२६ येथे नाट्यगृह इमारत बांधणे कामाकरीता पी.के.दास अँड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नेमणुक करणेबाबत...

विषय क्रमांक-४२) मानधनावर सहाय्यक पदावर नियुक्ती करणेबाबत – मा.बाळासाहेब तरस, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४३) राष्ट्रीय अभियंता दिनाचे आयोजनासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत – मा.सुनिता गवळी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४४) मुदत ठेवीबाबत - मा.सुनिता गवळी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४५) प्र.क्र.२७ मोरवाडी मधील मुख्यरस्त्यावरील खड्डे, चर बुजविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक-४६) प्रभाग क्र.१५ विठ्ठल मंदिर पर्यंतच्या डी.पी. रोडचे रुंदीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक-४७) मजकुर समाविष्ट करणेबाबत–मा.संध्या गायकवाड,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४८) ब्लेझर खरेदी करणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव...

--------

ठराव क्रमांक – ११२३२ विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.रमाओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४२७/१४ दि.२७/१/२०१५
विषय - प्र.क्र.७ च-होली व परिसरातील विविध ठिकाणचे मनपाच्या ताब्यात आलेले रस्ते खडीकरण व बीबीएमने विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३३ विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४००/१५ दि.५/१/२०१५
विषय - प्र.क्र.७ च-होली येथील ताजणेमळा, काळजेवाडी कोतवालवाडी पठारे मळा व इतर ठिकाणचे अंतर्गत रस्ते खडीकरण व बीबीएम करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३४ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/६४/१५ दि.२७/२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/HO/२५/४३/२०१४-१५ अन्वये, बोपखेल वॉर्ड क्र.६४ मधील विकास आराखड्यातील रस्ते विकसीत करणेकामी M/S. SHREEGANESH CONSTRUCTION (नि.र.रू.२७,९९,०६६/- (अक्षरी र.रू. सत्तावीस लाख नव्यान्नव हजार सहासष्ट फक्त) पेक्षा -२५.७०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२१,८३,६९१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३५ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/११०/१५ दि.७/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/HO/२५/४१/२०१४-१५ अन्वये, व्दारकानगरी ते पंप स्टेशन पर्यंतचा रस्ता डब्लूबीएम व बीबीएम करणेकामी M/S. M P DHOTRE CONSTRUCTION (नि.र.रु.२९,९८,९६६/-(अक्षरी र.रू.एकोणतीस लाख अठ्ठाण्णव हजार नऊशे सहासष्ट)

पेक्षा –४१.०१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१८,५७,५४५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३६ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – उद्यान
सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३३/२०१५ दि.१३/३/२०१५
विषय - आई उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३७ विषय क्रमांक –६
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – उद्यान
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३२/२०१५ दि.१३/३/२०१५
विषय - कै.हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३८ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – उद्यान
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४अ/कावि/२६९/२०१५ दि.२५/३/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा.चे क, ड, ई क्षेत्रीय कार्यालयातील उद्यानासाठी पोयटा माती पुरविणे व पसरविणेचे काम मे.प्रियांका एंटरप्रायझेस यांना निविदा रक्कम रुपये ९,८०,९३८/- (अक्षरी र.रु.नऊ लाख ऐंशी हजार नऊशे अडोतीस फक्त) या निविदाधारकांची एकूण १४०० घ.मी. पोयटा माती करीता प्रति घ.मी. र.रु.५७३/- या सर्वात कमी दराची निविदा स्वीकृत करणेत आले असुन कामाचा आदेश देणेकरीता करारनामा करुन घेणेस तसेच पोयटा माती पुरविणे व पसरविणेचे कामी येणा-या रक्कम रुपये ९,८०,९३८/- (अक्षरी र.रू. नऊ लाख ऐंशी हजार नऊशे अडोतीस) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२३९ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- १) मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २५/०३/२०१५ ठराव क्र.८२ नुसार,

मा.सभापती, क्रीडा समिती यांचे कार्यालयात सुप्रसिध्द खेळाडूंचे (राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय) विविध खेळांचे छायाचित्र लावणेकामी कोटेशन काढून त्वरित खरेदी करणेस तसेच पिं.चिं.मनपा हद्दीतील खेळाडूंना (हॉकी) सरावासाठी हॉकीस्टीक (ग्रॅफाईट) त्वरित कोटेशन काढून खरेदी करणेस तसेच पिं.चिं.मनपाचे जलतरण तलावावर जीवरक्षक साहित्य खरेदी करणे (लाईफ जॅकेट, स्विमिंग रिंग, बांबू, रस्सी इ.) त्वरित कोटेशन काढून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४० विषय क्रमांक – ९

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.रमाओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भः- १) मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २५/०३/२०१५ ठराव क्र.८३ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपा व प्रोफेशनल टेनिस कन्सलटंट प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने लॉन टेनिस अकादमी सुरु करणेस व त्या अनुषंगाने अटी व शर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४१ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भः- १) मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २५/०३/२०१५ ठराव क्र.८४ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपा व धनराज पिल्ले स्पोर्टस् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने हॉकी अकादमी सुरु करणेस व त्या अनुषंगाने अटी व शर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४२ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भः- १) मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २५/०३/२०१५ ठराव क्र.८५ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपा व गगन नारंग स्पोर्टस् प्रमोशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुटिंग अकादमी सुरु करणेस व त्या बाबतच्या अटी व शर्ती निश्चित करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४३ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- १) मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २५/०३/२०१५ ठराव क्र.८६ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपा व संकेत शेट्टी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बॅडमिंटन अकादमी सुरु करणेस व त्याकामी अटी व शर्ती निश्चित करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४४ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/२/कावि/२०२/१५ दि.२६/३/२०१५

विषय- भोसरी येथील कै आंकुशराव लांडगे नाटयागृहाचे स्वच्छता व साफसफाई विषयक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४५ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२०१९/१५ दि.२७/३/२०१५

विषय - भोसरी पंपींग स्टेशन वरील किरकोळ दुरुस्तीची कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४६ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२०२०/१५ दि.२७/३/२०१५

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/८७/२०१४-१५ मधील अ.क्र.५० अन्वये, प्रभाग क्र.७ च-होली व वडमुखवाडी टाकीवरुन वितरण होणा-या भागातील मुख्य जलवाहिनीचे देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.व्ही.आय.पी.राव डेव्हलपर्स (निविदा रक्कम रू.११,१९,५७०/- (अक्षरी र.रू. अकरा लाख एकोणीस हजार पाचशे सत्तर फक्त) पेक्षा १७.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.९,६४,०६७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४७ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.रमाओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३फ/१३४/१५ दि.३०/३/१५

विषय -संभाजीनगर प्र.क्र.९ मधील जलतरण तलावाची स्थापत्य विषयक विद्युत विषयक आणि फिल्टरेशन व क्लोरिनेशन बाबत...

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४८ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/२०५/१५ दि.३०/३/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड मनपा परीसरातील बीआरटीएस कॉरिडोरवर बस थांबे उभारणे व अनुषंगिक कामे करणे अंतर्गत अ)पिंपरी चिंचवड परिसरात PMPML करीता ठिकठिकाणी बस थांबे उभारणेबाबत...

विषय क्रमांक १७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२४९ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/२७४/१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.क्वालिटी केटरर्स यांची माहे मार्च २०१५ अखेर मुदत संपत आलेली असलेने व पॅन्ट्री चालू करणेबाबतच्या निविदेस अजून कालावधी लागणार असलेने मनपा हद्दीतील पिवळे व केशरी रेशनकार्ड धारक रुग्णांना मोफत आहार पुरविणे तसेच राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नोंदणी झालेल्या रुग्णांना मोफत आहार पुरविणे आवश्यक असलेने मे.क्वालिटी केटरर्स यांना प्रतिदिन प्रति रुग्ण आहार र.रु.९०/-या मंजुर दराने पॅन्ट्री चालू करणेबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा दि.१/४/२०१५ ते दि.३१/९/२०१५ यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यानुसार प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५० विषय क्रमांक – १९

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/२४०/१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रुग्णालयातील कॅन्टीन व पॅन्ट्री चालविणेबाबतची या एकाच निविदेकरीता आर.एफ.पी. बनविणेचे काम पुर्णात्वात आले असून त्याकामी निविदा प्रसिध्द करावी लागणार आहे. याकामी कमीत कमी दोन-तीन महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे.क्वॉलिटी केटरर्स यांना देण्यात आलेल्या आदेशाची मुदत दिनांक २०/०४/२०१५ रोजी संपुष्टात येणार असल्याने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक –

१०८०९, दिनांक १७/०३/२०१० नुसार त्यांचे समवेत दिनांक १२/०५/२०१० रोजी झालेल्या करारनाम्यास अधिन राहून सहा महिने कालावधीकरीता अथवा निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कॅन्टीनची व्यवस्था चालविण्यास देण्यास व त्यांचेकडून कॅन्टीनची ठेका फी म्हणून प्रति महिना र.रु.२५,०००/- वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५१ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/७/कावि/१७२/१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमी/दफनभुमी येथे काळजीवाहक नेमणेकामी वैद्यकीय विभागाकडील निविदा नोटीस क्र.१२/२०१२-१३ अन्वये पात्र २५ संस्थांची नेमणुक करणेत आली आहे. सदर निविदेतील अट क्र.११ नुसार सामाजिक/धर्मदाय संस्थानी मागणी केलेस त्यांना निविदा प्रक्रीयेतुन वगळुन काम देणेची तरतुद असुन त्यानुसार एकुण ५ दफनभुमीचे ठिकाणी काळजीवाहक पुरविण्याचे काम देणेत आले आहे. म.न.पा.चे मोरवाडी येथील लिंगायत दफनभुमीचे ठिकाणी काळजी वाहक पुरविणेकामी मल्लिकार्जुन प्रतिष्ठाण, प्राधिकरण यांनी केलेल्या विनंतीनुसार याकामी त्यांची दि.२५/८/२०१४ ते दि.१९/५/२०१६ या कालावधीसाठी प्रति काळजीवाहक प्रति महिना र.रु.७,०७९/- या दराने काळजीवाहक पुरविणेकामी करारनामा करुन कामाचे आदेश देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५२ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/२६२/१५ दि.३०/३/२०१५

विषय - प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या शाळा इमारतींची दैनंदिन साफसफाई करणेचे कामास मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२५३ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – वैद्यकिय मुख्य

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/४/कावि/७६०/२०१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन आदेशानुसार जागतिक महिला आरोग्य दिन व जागतिक महिला दिन या निमित्ताने महिला आरोग्य अभियाना अंतर्गत दि.९/३/२०१५ रोजी आयोजित आरोग्य शिबिरासाठी झालेल्या खर्च र.रू. ७,९६५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५४ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१२६/१५ दि.२७/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि.१७/१/२०१५ ते ८/३/२०१५ या कालावधीत अनाधिकृत बांधकाम आढावा बैठक, ट्रिंग ट्रिंग डे (सायकल डे), स्वरसागर संगीत महोत्सव, पवनाथडी जत्रा, घरकुल लकी ड्रॉ, शिवजयंती व्याख्यानमाला, स्थायी समिती सदस्य व सभापती निवडणूक, आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, महापौर चषक बोटिंग स्पर्धा व शरीर शौष्ठव स्पर्धा, मा.अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते मनपाच्या विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन व उद्घाटन समारंभ इ. कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी, पुणे-२७ यांच्याकडून (मे.रामा व्हिजन, थेरगांव यांच्याकडील जुन्या दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु.६५,६००/- (अक्षरी र.रु.पासष्ट हजार सहाशे फक्त) इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५५ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य
सुचक – मा.रमाओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/२६३/१५ दि.३०/३/२०१५

विषय – तरतूद वर्गीकरणाबाबत ...

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५६ विषय क्रमांक –२५
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/२७९/१५ दि.३१/३/२०१५

विषय - सॅनिटायझर विथ अँक्सेसरीज खरेदीबाबत ...

विषय क्रमांक २५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५७ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/२/कावि/११४/२०१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी येथे शासनाचे इन्स्पेक्शन कमिटी, नागपूर महानगरपालिका, क्रीडा समिती, जर्मन देशाचे शिष्टमंडळ, भोपाळ महानगरपालिकेचे शिष्टमंडळ यांचा मनपा अभ्यास दौ-याच्या वेळी चहापान व भोजन इ. हॉटेल भोला, हॉटेल कलासागर व

हॉटेल किज मध्ये करण्यात आलेली होती. त्यासाठी एकत्रित र.रु.४८,६५२/- (अक्षरी र.रु. आठ्ठेचाळीस हजार सहाशे बावन्न फक्त) इतका खर्च झालेला आहे. या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५८ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – विद्युत

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/५८/२०१५ दि.३१/३/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१६/२०१४-१५ मधील अ.क्र.३ अन्वये, ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागातील सार्वजनिक चौकात विविध उंचीचे हायमास्ट फिटिंग्ज बदलणेकामी मे.आर.एन.एंटरप्रायजेस (नि.र.रू.१६,७५,६१७/- [अक्षरी र.रू.सोळा लाख पंचाहत्तर हजार सहाशे सतरा] पेक्षा २५.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२५९ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/५२/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी पुलाखालील जूना कत्तलखाना यापूर्वीच बंद करणेत आला आहे. सद्यस्थितीमध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये कत्तलखान्यासाठी सुविधा उपलब्ध नसल्याने प्रकरणाचे गांभीर्य व आवश्यकता लक्षात घेता मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दि.२६/०२/२०१५ रोजी आदेश पारित केले असून या आदेशानुसार कत्तलखान्याची सुविधा ४ आठवड्यामध्ये उपलब्ध करणेचे निदेश महानगरपालिकेस दिले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये योग्य जागा न मिळाल्यास मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे विशेष अधिकारांतर्गत महानगरपालिका हद्दी बाहेरील पर्यायी जागा ताब्यात घेणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे (Escrow Account of the Collector) या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- (र.रु. एक कोटी) जमा करण्याबाबत निर्देश दिले आहेत. यास अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कत्तलखाना उभारणे कामी जागा उपलब्ध न झालेस मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचे आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे (Escrow Account of the Collector) या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- (र.रु.एक कोटी) जमा करणे आवश्यक आहे. नगररचना व विकास विभागाचे सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकातील भूसंपादन निधी या लेखाशिर्षातून मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे नावे धनादेशाव्दारे र.रु.१,००,००,०००/- (र.रु.एक कोटी) तातडीने अदा करणे आवश्यक असल्याने सदर रक्कम अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६०
विषय क्रमांक – २९
दिनांक – ०७/०४/२०१५
विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे
अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/३१२/१५ दि.३०/३/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या कामगार कल्याण विभागासाठी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचा-यांना सेवानिवृत्ती सन्मान चिन्हे खरेदीकामी ई–निविदा क्र.३३/२०१४-१५ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.पदमयोग, पुणे, यांचे आवश्यक सेवा निवृत्ती सन्मानचिन्हे बाब क्र.१ (एकूण १०० नग) साहित्याचे र.रु.१,२०,०००/- लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २५.२८% ने कमी आहे. मे.पदमयोग, पुणे. यांचे आवश्यक सेवानिवृत्ती सन्मानचिन्हे खरेदी करणेकामी एकूण र.रु.१,२०,०००/- दर स्विकृत करण्यास मा.सह आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६१
विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०७/०४/२०१५
विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.संपत पवार
अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३४१/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-२०१५ मधील क्र.१७ अन्वये,प्रभाग क्र.४१ मधील गांधीनगर झोपडपट्टीमधील स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.मोहम्मद ईसाक शेख नि.र.रु.१८,६५,६७२/- (अक्षरी र.रू.अठरा लाख पासष्ठ हजार साहशे बहात्तर) पेक्षा ४०.६७% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.११,०६,९०३/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६२
विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०७/०४/२०१५
विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.धनंजय आल्हाट
अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३४२/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.०१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.३८ अन्वये एम.बी.कॅम्प मधील झोपडपट्टयातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे इतर अनुषांगीक कामे करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.१४,९२,३६६/- (अक्षरी र.रु. चौदा लाख ब्यान्नव हजार तीनशे सहासष्ठ फक्त) पेक्षा ३% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१४,४७,५९५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६३ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.रमाओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३४३/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.०१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.३४ अन्वये प्रभाग क्र.२७ मधील इंदिरानगर झोपडपट्टीत रस्त्याचे डांबरीकरण करणे व इतर अनुंषागिक कामे करणेकामी मे. एच.सी.कटारीया (नि.र.रु १४,९३,०००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख त्र्यान्नव हजार फक्त) पेक्षा ३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.१४,४८,२१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६४ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३४४/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.०१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.७३ अन्वये प्रभाग क्र.४१ मधील गांधीनगर झोपडपट्टीत रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.१८,५५,४००/- (अक्षरी र.रु.अठरा लाख पंच्चावन्न हजार चारशे फक्त) पेक्षा ३.२५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१७,९५,१००/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६५ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/२७५/१५ दि.३१/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील दि. ५/०२२०१५ चे पत्रान्वये मनपा हद्दीमध्ये स्वाईन प्लु या आजाराचे रुग्ण आढळुन येत असलेने सदर आजाराबाबत

घ्यावयाची काळजी व करावयाच्या उपाययोजना बाबत जनजागृती करिता आवाहनपत्रके २,००,००० नग (२,००० शेकडा) छपाईकामी मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी दिलेले प्रती शेकडा र.रु.३१९ प्रमाणे र.रु. ६,३८,०००/- खर्च येत आहे. सदरची छपाई ही १० लाखपर्यंतचे थेट पध्दतीने करारनामा न करता देणेबाबत शासन निर्णयानुसार करणेकामी प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – ११२६६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – जलनिःसारण, ब क्षेत्रिय

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/कावि/TB drainage/७६/१५ दि.४/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपरी, चिंचवड, थेरगाव, भोसरी, आकुर्डी, निगडी या गावातील मलनिःसारण नलिका २० ते २५ वर्षापुर्वी टाकणेत आलेली आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी लोकसंख्या वाढलेली असून मलनिःसारण नलिकांची क्षमता कमी पडत आहे व ब-याच ठिकाणी मलनिःसारण नलिका नादुरुस्त झालेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी सांडपाण्याचे निचरा व्यवस्थित होत नाही. नागरिक व सन्मा.सदस्यांचा सदर मलनिःसारण नलिका बदलणेस मागणी होत आहे. मा.आयुक्त यांना त्यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.२२/०८/२०१४ नुसार या कामासाठी मान्यता दिलेली आहे.

तसेच लोकसंख्या वाढ झाल्यामुळे पिंपळे निलख, चिंचवड, च-होली येथील मलशुद्धीकरण केंद्राची क्षमता कमी पडत आहे. तसेच बोपखेल येथे नव्याने मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे आवश्यक आहे.

वरील कामे तांत्रिकदृष्ट्या अचुक व पुढील ३० वर्षांचा कालावधी गृहीत धरुन करणे आवश्यक आहे. त्यासाठी जुन्या मलनिःसारण नलिकांचे सर्व्हेक्षण करणे, नव्याने टाकणेत येणा-या मलनिःसारण नलिकांची हायड्रोलीक डिझाईन करुन ते कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडुन तपासणी करुन घेणे व त्याप्रमाणे विस्तृत अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तसेच ही कामे करणेसाठी केंद्रशासनाच्या नवीन NUDM (New Urban Development Mission) योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेता येईल. सदर काम करणेसाठी तसेच आवश्यक त्या ठिकाणी मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे यासाठी निविदा कार्यवाही पुर्ण करणेसाठी तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड मनपाच्या नविन हद्दीमध्ये JNNURM अंतर्गत मलनिःसारण नलिका टाकणे, मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे इ. साठी महापालिका सभा ८.७.५५७३ दि.१८/८/२००५ नुसार मे.युनीटी कन्सल्टंट यांची नेमणुक करणेत आलेली आहे. सदर सल्लागार यांनी व्यवस्थितरित्या पुर्ण करुन टप्पा १ व टप्पा २ यांनी अंतिम करुन त्याचे अनुदानही प्राप्त झालेले आहे.

तरी उपरोक्त काम हे मे.युनीटी कन्सल्टंट यांचेकडुन प्रकल्प किंमतीच्या १.३५% याप्रमाणे अधिक नियमानुसार सेवा कर इतकी सल्लागार फी अदा करावी लागणार आहे. तरी याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६७ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/निविदा/कावि/५०/२०१४ दि.२५/३/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/१/२०१४-१५ अन्वये, प्रभाग क्र.१४ भक्ती शक्ती उद्यान येथील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस.एस.गावडे (नि.र.रू.९,३४,३७०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख चौतीस हजार तिनशे सत्तर फक्त) पेक्षा -१८.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,९४,७८०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६८ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.शांताराम भालेकर, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सोईसाठी यापुर्वी अ/ब/क/ड अशा चार प्रभाग कार्यालयामार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्याचे काम होते आहे. तथापि यामध्ये अधिक सुलभता येवून नागरीकांना अधिक सोयीचे व्हावे यादृष्टीने मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र. प्रशा/२/कावि/४१/२०१४ दि.२१/१/२०१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील ४ ऐवजी ६ प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आली. दि.२६/१/२०१४ पासुन नव्याने फ क्षेत्रीय कार्यालय कार्यान्वित झालेले आहे.

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८१३९ दि.२/९/२०१४ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागासाठी TATA LPT 407/34 BS4 हे वाहन कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.पंडीत ऑटोमोटीव्ह यांचेकडून शासकीय दराने थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.११,७१,४८२.७५/- चे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत वाहनाची किंमत वाढलेमुळे TATA LPT 407/34 BS4 हे वाहन खरेदीसाठी सर्व करांसहीत र.रु.१२,२०,५३६/- (अक्षरी र.रु.बारा लाख वीस हजार पाचशे छत्तिस फक्त) प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तरी फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागासाठी TATA LPT 407/34 BS4 वाहन खरेदीसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु.१२,२०,५३६/- कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२६९ विषय क्रमांक – ३८
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

दिघी येथील गबाजी गवळी उद्यान श्री गणेश तरुण मंडळ, भोसरी यांस पुढील अकरा महिने कालावधीसाठी योग्य त्या अंशतः सेवाशुल्क तत्वावर देखभाल, संरक्षणाकामी देण्यास व त्याकामी

येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७०  विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक – मा.अनिता तापकीर  अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

इ प्रभाग नव्याने स्थापन झाला आहे. पावसाळ्यापूर्वी इ प्रभागातील स्टॉर्म वॉटर चेंबर तातडीने साफ करणे आवश्यक असल्याने इ प्रभागातील सर्व स्टॉर्म वॉटर चेंबर मे.विपुल असोसिएटस् यांचेकडून त्यांचे सन २०१४-१५ अ प्रभागातील मंजूर लघुत्तम निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात करुन घेणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७१  विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०७/०४/२०१५  विभाग – स्थापत्य अ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे  अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/मु.का./२८७/१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सायन्सपार्क परिसरात तारांगण उभारणे हा महात्वाकांक्षी प्रकल्प मनपाने हाती घेतला आहे. सदर प्रकल्पाची निविदा रक्कम रु.१४,६४,३२,६६२/- इतकी आहे. पिंपरी चिंचवड शहर सौंदर्याच्या दृष्टीने सदरचा तारांगण इमारत प्रकल्प हा वैशिष्ठयेपूर्ण असून शहराच्या मानांकनात भर घालणारा आहे. सदर तारांगण प्रकल्पासाठी नियमित कामाची देखरेख करणे, कामातील सर्व बाबींची निविदा विनिर्देशा नुसार (Specification) गुणवत्ता तपासणी करणे, प्रत्यक्ष साईटवर विविध कामांसाठी विविध खात्यांचा समन्वय (Co-ordination) बैठका घेणे, वेळोवेळी आवश्यक कागदपत्रे तयार करणे, मासिक अहवाल नियमितपणे देणे, देयके तपासणी करणे, प्रकल्प हस्तांतरणासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करुन संबंधित प्राधिकरणाकडून पूर्णत्वाचा दाखला (Completion certificate) प्राप्त करणे इ. सर्व निविदा पश्चात कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) तातडीने नेमणे आवश्यक आहे. मे.पी.के.दास अँड असोसिएटस यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामाचा विचार करता त्यांची मनपाच्या सद्यस्थितीतील पर्यटण विकास आराखडा अंतर्गत अनेक प्रकल्पासाठी तज्ञ वास्तुविशारद म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यानुसार वास्तुविशारदांचे दृष्टीकोनातून संकल्पचित्राप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.पी.के.दास अँड असोसिएटस यांची निविदा पाश्चात कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करणे उचित होईल. वास्तुविशारद मे.पी.के. दास अँड असोसिएटस् यांचा मनपाच्या सल्लागार पॅनलवर सन २०१५-२०१८ या कालावधीकरिता नेमणुक करणेस व तदनंतर वरील सर्व बाबींचा विचार करता, कामाचे स्वरुप तसेच तातडीची आवश्यकता पाहता, तज्ञ वास्तुविशारद मे.पी.के. दास अँड असोसिएटस् यांची प्रकल्प व्यवस्थाफ्न सल्लागार (PMC) म्हणुन निविदा पश्चात (Post Tender) नेमणुक करणेच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मे.पी.के. दास अँड असोसिएटस् यांची सायन्स पार्क येथे तारांगण इमारत विकसीत करणेसाठी

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन निविदा पश्चात (Post Tender) कार्यवाहीसाठी नेमणुक करणेस तसेच मनपा प्रचलित दराने प्रकल्प किंमतीच्या १.३५% फी + सेवा कर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७२ विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य अ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/मु.का./२८८/१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

निगडी प्राधिकरण येथे नाटयगृह बांधणे हा महात्वाकांक्षी प्रकल्प मनपाने हाती घेतला आहे. सदर प्रकल्पाची निविदा रक्कम रु.३७,२५,००,०००/- इतकी आहे. पिंपरी चिंचवड शहर सौंदर्याच्या दृष्टीने सदरचा नाटयगृह इमारत प्रकल्प हा वैशिष्ठयेपूर्ण असून शहराच्या मानांकनात भर घालणारा आहे सदर नाटयगृह प्रकल्पासाठी नियमित कामाची देखरेख करणे, कामातील सर्व बाबींची निविदा विनिर्देशा नुसार (Specification) गुणवत्ता तपासणी करणे, प्रत्यक्ष साईटवर विविध कामांसाठी विविध खात्यांचा समन्वय (Co-ordination) बैठका घेणे, वेळोवेळी आवश्यक कागदपत्रे तयार करणे, मासिक अहवाल नियमितपणे देणे, देयके तपासणी करणे, प्रकल्प हस्तांतरणासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करुन संबंधित प्राधिकरणाकडून पूर्णत्वाचा दाखला (Completion certificate) प्राप्त करणे इ. सर्व निविदा पश्चात कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापना सल्लागार (P.M.C.) तातडीने नेमणे आवश्यक आहे. मे.पी.के.दास अँड असोसिएटस यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामाचा विचार करता त्यांची मनपाच्या सद्यस्थितीतील पर्यटण विकास आराखडा अंतर्गत अनेक प्रकल्पासाठी तज्ञ वास्तुविशारद म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यानुसार वास्तुविशारदांचे दृष्टीकोनातून संकल्पचित्राप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.पी.के.दास अँड असोसिएटस यांची निविदा पाश्चात कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करणे उचित होईल. मनपाच्या विविध प्रकल्पाचे कामांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) आहेत. सद्यस्थितीत कामे प्रकल्प सल्लागार यांचे देखरेखीखाली प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्पांचे सल्लागारांना अदा करणेत येत असलेली निविदा पाश्चात फी पैकी लघुत्तम म्हणजे प्रकल्प किंमतीच्या १.३५% + सेवाकर एवढी आहे. वास्तुविशारद मे.पी.के.दास अँड असोसिएटस् यांचा मनपाच्या सल्लागार पॅनलवर सन २०१५-२०१८ या कालावधीकरिता नेमणुक करणेस व तदनंतर वरील सर्व बाबींचा विचार करता, कामाचे स्वरुप तसेच तातडीची आवश्यकता पाहता, तज्ञ वास्तुविशारद मे.पी.के. दास अँड असोसिएटस् यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन निविदा पश्चात (Post Tender) नेमणुक करणेच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मे.पी.के. दास अँड असोसिएटस् यांची प्राधिकरण सेक्टर क्र.२६ येथील नाट्यगृह इमारत विकसीत करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन निविदा पश्चात (Post Tender) कार्यवाहीसाठी नेमणुक करणेस तसेच मनपा प्रचलित दराने प्रकल्प किंमतीच्या १.३५% फी + सेवा कर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७३ विषय क्रमांक – ४२
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.बाळासाहेब तरस, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडे नियमित भरती बंद असल्यामुळे व क्रीडा विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे क्रीडा विभागाकडून वर्षभर कबड्डी, खो-खो, फूटबॉल, व्हॉलीबॉल असे विविध महापौर चषक स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेसाठी ग्राऊंड आखणेसाठी मनुष्यबळ नसल्यामुळे बाहेरुन करुन घ्यावे लागते. त्यामुळे या कामातील तज्ञ व अनुभवी श्री.सैफन रजाक शेख यांची सहाय्यक प्रति माह र.रु.१०,०००/- मानधनावर नियमुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७४ विषय क्रमांक – ४३
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अभियंते यांचेकरीता प्रति वर्षी कामगार कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय अभियंता दिन १९/९/२०१४ रोजी आयोजन करणेत आले. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील राष्ट्रीय अभियंता दिनाचे आयोजनासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु.१,४४,६२२/- रक्कमेस थेट पद्धतीने अदा करणेस कार्योत्तर मान्यता देवून सदरचा खर्च कामगार कल्याण विभागाकडील सांस्कृतिक कार्यक्रम या लेखाशिर्षकामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७५ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम – ९२ मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने शिलकी रकमा राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत गुंतवणूक करण्याची तरतुद आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.४५० दि.२/५/२०१२ अन्वये शिलकी रकमांची वेळेत गुंतवणूक होण्याचे दृष्टीने व पुर्नगुंतवणूक वेळेत होणेचे दृष्टीने मा.अध्यक्ष स्थायी समिती यांना गुंतवणूकीबाबत अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे शिफारशीनुसार व मा.आयुक्त यांनी मुदत ठेवीत राष्ट्रीयकृत बँकेत केलेल्या गुंतवणूकीस व पुर्नगुंतवणूकीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७६ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/१अ/कावि/३५१/१४ दि.७/११/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/ब मुख्यालय/HO/७/१९/२०१४-१५ अन्वये, प्रभाग क्र.२७ मोरवाडी मधील मुख्य रस्त्यावरील खड्डे, चर बुजविणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणेकामी M/s. M.P.DHOTRE CONSTRUCTION (नि.र.रू.२१,००,८४०/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख आठशे चाळीस फक्त) पेक्षा -४०.०५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१३,२२,४२६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७७ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ०७/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/९७/१५ दि.६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ मुख्यालय/HO/७/९७/२०१४-१५ अन्वये, प्रभाग क्र.१५ विठ्ठल मंदिरपर्यंतच्या डी.पी. रोड चे रुंदीकरण करणेकामी M/s. M.P.DHOTRE CONSTRUCTION (नि.र.रू.२३,३४,२६७/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ट फक्त) पेक्षा -४४.४१% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१३,६२,५००/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७८ विषय क्रमांक – ४७
दिनांक – ०७/०४/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.९१५६ दि.१४/११/२०१४ मधील काम क्रमांक ११ हा मजकूर वगळणेत येऊन त्याऐवजी काम क्रमांक १४ हा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११२७९ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०७/०४/२०१५

सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक –मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.विनायक गायकवाड, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव...

मा.क्रीडा समिती ठराव क्र.८८ दिनांक २५/३/२०१५ नुसार कोटेशन काढून तीस ब्लेझर खरेदीस मंजूरी देण्यात आली असून सदरचे दराने मा.अध्यक्ष स्थाती समिती, मा.शिक्षण अधिकारी व मा.सहा.आयुक्त (क्रीडा) यांचेसाठी तीन ब्लेझर असे एकूण ३३ ब्लेझर खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/४५/२०१५
दिनांक - ०८/०४/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.